## नियमीत दिवाणी दावा क्रं. १८८/२०१७ मधील नि. १४५ खाली आदेश

प्रस्तुत दावा वादीने वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई करीता दाखल केला आहे.

**०२.** सदर दाव्यातील प्रतिवादी नं. ३–ब सुनिल बळवंत देसाई हे दि.२५–०१–२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे सदर प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी नं. ३–ब यांना अर्जात नमुद केले प्रमाणे कायदेशीर व सरळ वारस असुन त्यांचे शिवाय प्रतिवादी नं. ३–ब यास अन्य कोणीही कायदेशीर व सरळ वारस नाहीत.

**०३.** प्रतिवादी क्रं. ३–ब चे वारस रेकॉर्डवर आलेने प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वारस रेकॉर्डवर न आलेस वादीचे कायदेशीर हक्क डावलेले जावुन न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०४.** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जाच्या पाठीमागे दिले असून त्यामध्ये त्यांनी योग्य ते आदेश पारीत करावेत असे कथन केले आहे.

**०५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्रं. ३–ब चे वारस रेकॉर्डवर घेतलेस दाव्याच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश.**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्रं.३–ब च्या वारसा बाबत पुढील तारखेस न चुकता दुरुस्ती करावी.

दि.०१.०९.२०२२.
कळे–खेरीवडे.

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे–खेरीवडे.